महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७६ वा | दिनांक : १६/१२/२०२४ | वार : सोमवार

## महाराष्ट्रात ३३ कॅबिनेट, ६ राज्यमंत्र्यांची शपथ : मराठवाड्यातील ५ मंत्र्यांचा समावेश











**नागपूर** : मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांच्या शपथविधीनंतर दोन आठवडे होत आले, तरी मंत्रिमंडळाचा विस्तार होत नसल्यानं महायुतीत खातेवाटपावरून नाराजी आहे का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र, अखेरीस नागपूरमध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या आधी मंत्रिमंडळ विस्ताराला मुहूर्त मिळाला.

नागपूरमधील राजभवनाच्या लॉनवर मंत्रिमंडळ विस्ताराचा सोहळा पार पडला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

कुणाच्या वाट्याला किती मंत्रिपदं - देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने भाजपकडे मुख्यमंत्रिपद, तर अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि एकनाथ शिंदे (शिवसेना) हे उपमुख्यमंत्री आहेत.

भाजप – १९, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) – ११, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) – ९.

**भाजपचे मंत्रिमंडळातील नवे मंत्री** : महाराष्ट्रात भाजपच्या वाट्याला मुख्यमंत्रिपद आलं असून, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले आहेत. तसंच, १६ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्रिपदंही भाजपच्या वाट्याला आले आहेत.

भाजपनं तीन महिला नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिलं आहे.

**कॅबिनेट मंत्री** : १) चंद्रशेखर बावनकुळे, २) राधाकृष्ण विखे पाटील, ३) चंद्रकांत पाटील, ४) गिरीश महाजन, ५) अतुल सावे, ६) गणेश नाईक, ७) मंगलप्रभात लोढा, ८) शिवेंद्रराजे भोसले, ९) जयकुमार रावल, १०) पंकजा मुंडे, ११) आशिष शेलार, १२) अशोक उईके, १३) जयकुमार गोरे, १४) संजय सावकारे, १५) नितेश राणे, १६) आकाश फुंडकर

**राज्यमंत्री** : १७) माधुरी मिसाळ , १८) मेघना बोर्डीकर, १९) पंकज भोईर,

**शिवसेनेचे (शिंदे गट) मंत्रिमंडळातील नवे मंत्री** : शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री झाले असून, त्यांच्या पक्षाला ९ कॅबिनेट आणि २ राज्यमंत्रिपदं मिळाली आहेत.

तानाजी सावंत, दीपक केसरकर अशा नेत्यांना एकनाथ शिंदेंनी डच्चू दिलाय.

**कॅबिनेट मंत्री** : १) शंभुराज देसाई, २) उदय सामंत, ३) दादा भुसे, ४) गुलाबराव पाटील, ५) संजय राठोड
६) संजय शिरसाट, ७) प्रताप सरनाईक, ८) भरत गोगावले, ९) प्रकाश आबिटकर

**राज्यमंत्री** : १०) आशिष जयस्वाल, ११) योगेश कदम

**राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) मंत्रिमंडळातील नवे मंत्री** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ८ कॅबिनेट, तर एक राज्यमंत्रिपद मिळालं आहे.

छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील अशा दिग्गजांना अजित पवारांनी डच्चू दिल्याचं दिसून येत आहे.

**कॅबिनेट मंत्री** : १) हसन मुश्रीफ, २) आदिती तटकरे, ३) बाबासाहेब पाटील, ४) दत्तात्रय भरणे, ५) नरहरी झिरवळ, ६) माणिकराव कोकाटे, ७) मकरंद जाधव-पाटील, ८) धनंजय मुंडे

**राज्यमंत्री** :
९) इंद्रनील नाईक

## तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन



**मुंबई** : जगप्रसिद्ध तबलावादक आणि पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झाले. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबईत झाला. उस्ताद झाकीर हुसेन यांना १९८८ मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

झाकीर हुसेन यांना तीन ग्रॅमी पुरस्कारही मिळाले होते. त्यांच्या वडिलांचे नाव उस्ताद अल्लाह रक्खा कुरेशी आणि आईचे नाव बीवी बेगम होते. झाकीर यांचे वडील अल्ला राख हेही तबलावादक होते. झाकीर हुसेन यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील माहीम येथील सेंट मायकल स्कूलमधून झाले. याशिवाय मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधूनही पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले.

झाकीर हुसैन यांनी वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षी अमेरिकेत पहिला कॉन्सर्ट केला होता. १९७३ मध्ये त्यांनी त्यांचा पहिला अल्बम 'लिव्हिंग इन द मटेरियल वर्ल्ड' लॉंच केला.

## फडणवीस-शिंदे-पवार म्हणाले- विरोधकांचा सन्मान करू

**नागपूर** : येथे महायुती सरकारमधील मंत्रिमंडळाची शपथविधी पार पडली. त्यानंतर महायुतीच्या नेत्यांची बैठक देखील पार पडली. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर टीका केली आहे. महाविकास आघाडीमधील नेत्यांनी शपथविधीनंतरच्या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला होता. विरोधी पक्ष सातत्याने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकत असल्याची टीका अजित पवारांनी केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले, आमचे बहुमत आहे म्हणून आम्ही आमच्या पद्धतीने रेटू असे नाही. विरोधकांनी देखील प्रश्न विचारायचे असतात. विरोधक संख्येने जरी कमी असले तरी त्यांना दुर्लक्ष करणार नाही, अशी ग्वाही अजित पवारांनी दिली आहे. तसेच येत्या २ ते ३ दिवसात खातेवाटप होणार असल्याची माहिती देखील यावेळी अजित पवारांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आज मंत्रिमंडळ विस्तार झाला. गेल्या काही दिवसात तुम्हीच मंत्रिमंडळ विस्तार करत होतात असा टोला देखील पत्रकारांना शिंदेंनी लगावला आहे. पुढे ते म्हणाले, नागपूरमध्ये होणारे अधिवेशन आणि नागपूरकर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अभिनंदन करतो. २७ व्या वर्षी महापौर आणि आता मुख्यमंत्री झाले. पुन्हा येईन म्हणत काहींनी त्यांची टिंगल केली पण पुन्हा आले. आमच्या महायुतीची नवी इनिंग सुरू झाली आहे.

गेले अडीच वर्ष आम्ही टीम म्हणून काम केले. फडणवीस यांना असलेला अनुभव आम्हाला कामी आला आणि अजितदादा नंतर आले आणि आम्ही टीम म्हणून काम केले. आम्ही जे म्हणालो त्यावर जनतेने देखील विश्वास दाखवला. विदर्भमध्ये हे अधिवेशन होत आहे आणि विदर्भाला न्याय देण्यासाठी आम्ही अनेक निर्णय घेतले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ डिसेंबर २०२४


# संगीत महोत्सवात जि.प.प्रा.शा. टापरगाव ने मिळविला द्वितीय क्रमांक



**कन्नड (अरुण थोरात):** सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव कन्नड येथे आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये समूह नृत्य, समूह गायन, एकल नृत्य, एकल गायन असे कलाप्रकार सादर झाले. यात समूह नृत्य या प्रकारात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टापरगाव ता.कन्नड च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकधारा सादर केली व द्वितीय क्रमांक पटकावला त्यांना रोख रक्कम ३००० रुपये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिक आमदार संजनाताई जाधव यांच्या हस्ते मिळाले.

या विद्यार्थ्यांना नृत्य दिग्दर्शन शाळेच्या सहशिक्षिका छाया बाळकृष्ण माळवाळ, वर्षदा अनिल आवाळे यांनी केले व मोलाचे सहकार्य शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा बाबुलाल पाटील, सहशिक्षिका माधवी गोंडाणे, स्वप्ना सोनवणे यांनी केले.

या कार्यक्रमात सहभाग घेण्यासाठी गटशिक्षणाधिकारी श्रीमती श्रीश्रीमाळ, हतनूर केंद्राचे केंद्रप्रमुख सिताराम आहेर, केंद्रीय मुख्याध्यापक भागवत कल्याणकर यांनी प्रेरणा दिली. तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उषा औटे, मीनाताई अल्हाट, गावच्या सरपंच रूपालीताई मोहिते यांनीही सहकार्य केले. समस्त पालक वर्गाने देखील खूप सहकार्य केले.

## शालेय क्रीडा स्पर्धेतून शारीरिक व संघटनात्मक विकास होतो : प्रवीण शिंदे यांचे प्रतिपादन




**कन्नड प्रतिनिधी :** शालेय क्रीडा स्पर्धेतून शारीरिक बौद्धिक व संघटनात्मक विकास होतो शालेय जीवनातून विद्यार्थ्यांनी एक तरी खेळ खेळावा व आपलं करिअर घडावं असे आवाहन केले त्यानंतर खेळाडूसाठी जिल्हास्तर विभाग राज्यस्तर दहावी आणि बारावी साठी मार्क व राज्य खेळाडू प्रथम क्रमांक द्वितीय व तृतीय क्रमांक आरक्षण नोकरीमध्ये आहे अनेक असं खेळाडूंसाठी शासना परिपत्रक काढलेला आहे याचा खेळाडूंनी लाभ घ्यावा असं प्रतिपादन क्रीडा समिती समन्वयक व मार्गदर्शक प्रवीण शिंदे यांनी फातिमा कॉन्व्हेंट माध्यमिक शाळेच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थान भूषवित असतांना बोलले.

यावेळी शाळेच्या मॅनेजर सिस्टर. मिलाग्रीन, हायस्कूल मुख्याध्यापिका सिस्टर लीडा अबलीन रोडरिगस, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर प्रमिला, शाळेच्या सुपरवाझर सिस्टर रेबेका, सिस्टर आमला, सिस्टर जोना उपस्थित होत्या.

यावेळी व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, थ्रो बॉल, रिले १०० मीटर धावणे आदी स्पर्धा क्रीडा शिक्षक विशाल दांडेकर उमेश टेकाळे, राहुल गावंडे, सचिन शेलार,सुशीला दांडगे, मिस. गुलनार कुरेशी, ज्योती देशमुख, अर्चना पाटील, स्वप्नाली निकम, मिस. अश्विनी देशमुख, मिस. बिन्नी, मिस. अश्लेषा चव्हाण, मिस. प्रियांका भदाणे, प्रमोद खंडागळे, प्रमोद क्षीरसागर आदीं परिश्रम घेत आहेत. विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# असलम शेख दिग्दर्शित नाटकाचे आंतरराष्ट्रीय महोत्सवात सादरीकरण होणार





**छत्रपती संभाजीनर :** बागबान थिएटर ग्रूप यांचे गिरीश कर्नाड लिखित आणि असलम शेख दिग्दर्शित "ययाति" नाटकाचे राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्ली अंतर्गत २८ जानेवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान देशभरात सादर होणाऱ्या भारंगम (भारतीय रंग महोत्सव) या आंतरराष्ट्रीय महोत्सवात ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी बंगळूर येथे सादर होणार आहे.

राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्ली हे दरवर्षी भारंगम या नाट्य महोत्सवाचे आयोजन करीत असते. या नाट्यमहोत्सवात महाराष्ट्र देश आणि परदेशातून नाटके होत असल्याने याचे एक वेगळे प्रस्थ बनलेले आहे.

संपूर्ण भारत देशातील निवडक नाटकांसोबतच खालील देशांचे सादरीकरण होणार आहे - या आंतरराष्ट्रीय महोत्सवात जर्मनी, तैवान, श्रीलंका, पोलंड, ऑस्ट्रिया, झेक रिपब्लिक या देशांतील कलाकारांचे देखील सादरीकरण होणार आहे.

सहभागी कलावंत शुभम कोल्हे, प्रेरणा खरात, श्वेता गणगे, विशाखा शिरवाडकर, उल्का कुलकर्णी, ऋषिकेश कारके, संकेत बलांडे, किशोर थोरात यांचा अभिनय तर डॉ. गजानन दांडगे,, रामेश्वर देवरे, विनोद आघाव, रावबा गजमल , आदित्य इंगळे, वाल्मीक जाधव, जॉय भांबळ आदी कलाकार तांत्रिक बाजू सांभाळणार आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ डिसेंबर २०२४


## सुंदरवाडी येथील श्री दत्त जयंती विविध धार्मिक कार्यक्रम,भक्तिमय वातावरणात संपन्न....




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील परिसरातील सुंदरवाडी गावठाण येथील श्री दत्त मंदिरात दि.१४ वार शनिवार रोजी श्री दत्त जयंतीनिमित्त विधिवत पूजन, अभिषकांने, विविध धार्मिक कार्यक्रमाने भक्तिमय वातावरणात श्री दत्त जयंती साजरी झाली.

सण २००० मध्ये याठिकाणी मंदिर स्थापना झालेली असून २००८ साली मंदिर समितीचे स्थापना करण्यात आली. या मंदिराची प्रकाश भीमराव घुले महाराज मंदिर पुजारी म्हणून काम पाहतात. दररोज सकाळी व सायंकाळी ०७ वाजता मंदिरात नित्यनियमाने पूजन व आरती संपन्न होत असते.

दि.१४ वार शनिवार रोजी श्री दत्त जयंतीनिमित्त दि.०९ डिसेंबर ते १५ डिसेंबर रोजी सुंदर वाडी व मुरूम महिला मंडळाच्या वतीने गुरू पारायण सोहळा संपन्न होत असते. दि.१४ डिसेंबर रोजी अशोक मिणियार यांच्या हस्ते महापूजा व संजय मिणियार यांच्या हस्ते महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दि.१५ रोजी प्रकाश महाराज यांचे सुंदरवाडीत माधवगिरी (भिक्षा) व तसेच संजय टेकाळे (अंकल) यांच्या हस्ते महापूजा व आरती आयोजन करण्यात येते.दुपारी पुष्पवृष्टी कार्यक्रम पार पडतो. मंदिर समितीचे वतीने वर्षभर विविध सामाजिक,धार्मिक कार्यक्रम घेत असतात. श्री दत्त जयंतीनिमित्त भजन,कीर्तन, श्री दत्त पाळणा व महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

असंख्य भाविक भक्त दर्शनासाठी गर्दी असते, ०३ जून रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त मुरूम येथील प्रगतशील शेतकरी अशोक मिणियार यांच्या हस्ते श्री दत्त मूर्तीस अभिषेक करण्यात येते व विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असते. मंदिर समितीचे अध्यक्ष योगेश घुले, उपाध्यक्ष सुरेश सुरवसे,सचिव बबन दुधभाते सह सदस्य गण मंदिर उत्सवा निमित्त प्रयत्न शील असतात.

सुरेश बनसोडे, दिपक सुरवसे,डॉ. बळवंत चव्हाण, संजय टेकाळे, ॲड., उदय वैध, मल्लिनाथ मुदकण्णा, प्रदिप पाटील, हणमंत बनसोडे, दशरथ बनसोडे व अध्यक्ष योगेश घुले आणि मंडळ यांच्या उपस्थितीत समाजसेवक तथा बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष डॉ.रामलिंग पुराणे यांच्या शुभहस्ते पाणी ग्रहण करून प्रकाश महाराज यांचे अनुष्ठान (उपोषण) समाप्ती नंतर बाबुराव जवळकुट्टे, समस्त ग्रामस्थ सुंदरवाडी,मुरूम यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले जाते आणि श्री दत्त जयंती महोत्सवाचे सांगता संपन्न होते.निसर्गरम्य वातावरणात वसलेल्या या मंदिर स्थळी दर्शनासाठी मुरूम शहर, सुंदरवाडी परिसरातील भाविकांची अलोट गर्दी असते, महिला भगिनींचा श्री दत्त जयंतीनिमित्त उत्स्फूर्तपणे प्रतिसाद असतो.

## गुणवंतांकडून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडवावे : विनायक दाते



**यवतमाळ :** गुणवंत पाल्याचे कौतुक पाहण्यासारखे भाग्य इतर कुठलेच नसते. विवेकानंद विद्यालयातील पालकांना हे भाग्य दरवर्षी व वारंवार लाभत आले आहे. या विद्यार्थ्यांचे कौतुक पाहून नव्या पिढीलाही प्रेरणा मिळते. शाळेतील विद्यार्थ्यांनी

गुणवंतांकडून प्रेरणा घेऊन आपले आयुष्य घडवावे, असे प्रतिपादन विशुद्ध विद्यालय तथा वाणिज्य महाविद्यालय न्यासाचे अध्यक्ष विनायक दाते यांनी येथे केले.

येथील विशुद्ध विद्यालय द्वारा संचालित विवेकानंद विद्यालयामध्ये गुणवंतांचा गौरव करण्यात आला. शनिवार दि. १४ डिसेंबरला झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

त्यांच्यासोबत संस्थेचे सचिव विजय कासलीकर, संचालक सुषमा दाते व महेश जोशी, विवेकानंद विद्यालयाच्या मुख्याध्यापक मीनाक्षी काळे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सतीश डफळे, सहसचिव प्रगती वाघाडे, शाळेचे पर्यवेक्षक विवेक अलोणी व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्ज्वलन व सरस्वती पूजनानंतर मंचावरील अतिथींचे स्वागत करण्यात आले.

संगीत शिक्षक पूर्णाजी खानोदे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वागत गीत म्हटले. विवेक कवठेकर यांनी प्रास्ताविकातून गुणवंत गौरव कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. यानंतर शालेय प्रमाणपत्र परीक्षेतील शाळेतील प्रथम दहा विद्यार्थी, त्याचप्रमाणे शाळेतील होतकरू विद्यार्थी व कला, क्रीडा, साहित्य इत्यादी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प, स्मृतिचिह्न व रोख पारितोषिके देऊन अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे संचालन विवेक अलोणी यांनी केले. सत्काराला उत्तर देताना गुणवंत विद्यार्थी सोहम टारपे याने आपल्या यशामध्ये आई-वडील तसेच शाळेचे मोठे योगदान आहे असे सांगून आपण आपल्या या गुणांचा उपयोग समाजासाठी करू असे म्हटले. याप्रसंगी दिगंबर टारपे यांनीही शाळा व गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

संस्थेचे सचिव विजय कासलीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्था व शाळेच्या प्रयत्नांना विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या कष्टांची साथ गरजेची असते, असे म्हटले. सूत्रसंचालन वैशाली ठाकरे यांनी तर आभारप्रदर्शन महेश कोकसे यांनी केले.






## यावल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत निवड





**चोपडा :** येथे झालेल्या अविष्कार स्पर्धेत यावल महाविद्यालयातील फारूकी बीबी फातेमा हमीदुद्दीन, सय्यद सादिया रईस अली या विद्यार्थ्यांनी "समाजाभिमुख साहित्य मराठी आणि उर्दूचे भाषिक नाते' या स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन "उर्दू भाषिकांमध्ये मराठीचा प्रसार करणे' या विषयावर संशोधन सादर केले. याबद्दल जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत त्यांची निवड झाली.

यावल महाविद्यालयात प्र. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवले जातात.

२०२४-२५ या वर्षात विद्यापीठाशी संलग्नित यावल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्री दादासाहेब सुरेशजी पाटील महाविद्यालय चोपडा येथे पार पडलेल्या आविष्कार स्पर्धेत सहभाग घेतला. त्यात वेगवेगळ्या महाविद्यालयातील 600 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात फारूकी बीबी फातेमा हमीदुद्दीन (एफवायबीए), सैयद सादिया रईस अली (एफवायबीए) यांनी यश मिळवले. टीम लीडर व मेंटॉर म्हणून उर्दू विभागाचे प्रा.इम्राण खान यांची नियुक्ती केली होती. खान यांनी चांगल्या प्रकारे जबाबदारी पार पाडली.

त्याबद्दल प्र. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे, उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार, उपप्राचार्य व विद्यार्थी विकास विभागप्रमुख डॉ. सुधीर कापडे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, डॉ. हेमंत भंगाळे, डॉ.आर.डी. पवार यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. सादिया सय्यद फातिमा फारुकी